**जाहीरात**

**जा.क्र.जिमबाविअजळ/आस्था/निरि/मुलींचे/कंत्राटी पदे भरती/जाहिरात/592/2023-24 जळगांव दिनांक 01/03/2024.**

एकात्मीक बाल संरक्षण मार्गदर्शक सुचना शासन निर्णय महिला व बाल विकास ICPS-017/प्र.क्रं.180/का-8/ दिनांक 06 मार्च 2018 आणि मिशन वात्सल्य मार्गदशक सुचना दिनांक 05 जुलै 2022 आणि महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था पुणे, तथा आयुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय म.रा.पुणे यांचे पत्र क्रं. मराबासंस/रिक्त पद भरती का-3/2020/573/ दिनांक 27/08/2020, पत्र क्रं. 1042 दिनांक 18/11/2019 च्या अधिन राहुन महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभागांतर्गत जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित मुलींचे निरिक्षणगृह / बालगृह जळगांव या संस्थेत खालील प्रमाणे रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने 11 महिन्याच्या करार तत्वावर भरावयाची आहेत. त्या पदांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. तसेच सदर संस्था मुलींची संस्था असल्याने महीला उमेदवारांनीच अर्ज करावेत.

**जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित मुलींचे निरिक्षणगृह / बालगृह जळगांव.**

| अ .क्र . | पदाचे नाव | शैक्षणीक पात्रता | वयोमर्यादा वर्षे | अनुभव | पद संख्या | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | समुपदेशक (Counsellor) | 1. मान्यताप्राप्त विदयापीठाची समाजकार्य/समाजशास्त्र/ मानसशास्त्र किंवा समाजकार्य विषयात पदव्युत्तर पदवी<br>2. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( एम.एस.सी.आय.टी किंवा तत्सम अर्हता )<br>3. शासन मान्य मराठी टंकलेखन30( श.प्र.मि )<br>4. शासन मान्य इंग्रजी टंकलेखन 40 ( श.प्र.मि )<br>5. Graduate In Social Work/ Sociology/Psychology/Public Health/Counselling from a recognized university. | 18 ते 38 | किमान 01 वर्ष महिला व बालकांसोबत कामकाजाचा शासकिय/निमशासकिय /स्वयंसेवी खाजगी अनुभव. | 01 | 23,170/- |
| 2. | परिविक्षा अधिकारी (Probation Officer, Childwelfare Officer, Case Worker ) | 1. मान्यताप्राप्त विदयापीठाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी<br>2. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( एम.एस.सी.आय.टी किंवा तत्सम अर्हता )<br>3. शासन मान्य मराठी टंकलेखन 30 ( श.प्र.मि )<br>4. शासन मान्य इंग्रजी टंकलेखन 40 ( श.प्र.मि ) | 18 ते 38 | किमान 01 वर्ष महिला व बालकांसोबत कामकाजाचा शासकिय/निमशासकिय /स्वयंसेवी खाजगी अनुभव. | 01 | 23,170/- |
| 3. | प्रशिक्षक (Educator ) | 1. आय.टी.आय. उत्तीण<br>2. इ.10 वी 12 वी उत्तीर्ण, पदवी, पदव्युत्तर पदवी असल्यास.<br>3. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( एम.एस.सी.आय.टी किंवा तत्सम अर्हता ) | 18 ते 38 | महिला व बालकांसोबत कामकाजाचा शासकिय/निमशासकिय /स्वयंसेवी खाजगी अनुभव. | 01 | 10,000/- |
| 4. | कला / धंदे/ संगीत / शिक्षक ( Art & Craft cum Music Teacher ) | 1. प्रशिक्षक क्षेत्राचा डिप्लोमा ( ATD )<br>2. संगीत विशारद क्षेत्रातील पदवी असल्यास<br>3. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( एम.एस.सी.आय.टी किंवा तत्सम अर्हता ) | 18 ते 38 | महिला व बालकांसोबत कामकाजाचा शासकिय/निमशासकिय /स्वयंसेवी खाजगी अनुभव. | 01 | 10,000/- |
| 5. | खेळ प्रशिक्षक ( PT Instructor cum Yoga Teacher ) | 1. बी.पी.एड्<br>2. संगणकाचे ज्ञान आवश्यक ( एम.एस.सी.आय.टी किंवा तत्सम अर्हता ) | 18 ते 38 | महिला व बालकांसोबत कामकाजाचा शासकिय/निमशासकिय /स्वयंसेवी खाजगी अनुभव. | 01 | 10,000/- |
| 6. | स्वयंपाकी ( Cook ) | 1. एस.एस.सी उत्तीर्ण | 18 ते 38 | महिला व बालकांसोबत | 01 | 9,930/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कामकाजाचा शासकिय/निमशासकिय /स्वयंसेवी खाजगी अनुभव. | | |
| 7. | स्वच्छता कर्मचारी ( Housekeeper ) | 1. एस.एस.सी उत्तीर्ण | 18 ते 38 | महिला व बालकांसोबत कामकाजाचा शासकिय/निमशासकिय /स्वयंसेवी खाजगी अनुभव. | 01 | 7,944/- |
| | | | | **एकुण पदे** | **07** | |

**अटी व शर्ती**.

1. सदरची पदे ही कंत्राटी स्वरुपाची असल्याने 11 महीन्यांकरिता भरण्यात येतील.
2. सदर पदे ही पुर्णत: अस्थायी व कंत्राटी स्वरुपाची असुन मिशन वात्सल्य योजनेतंर्गत मानधनी तत्तवावर आहेत.
3. सदर पदावरिल नियुक्ती 11 महिन्याकरिता कंत्राटी तत्वावर असुन कामाच्या मुल्यांकनानुसार पुढील मुदवाढ देण्याबाबत निर्णय मा. अध्यक्ष निवड समिती तथा जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने घेण्यात येईल.
4. उमेदवारास नियुक्तीनंतर 15 दिवसाचे आत कामाच्या ठिकाणी कामावर हजर व्हावे लागेल. सदर उमेदवार विहीत कालावधीत कामावर हजर झाला नाही तर प्रतिक्षा यादीवरील उमेदवाराचा त्या त्या पदासाठी नियुक्तीचा विचार करण्यात येईल. 01 उमेदवार निवडायचा असल्यास 02 उमेदवार या प्रमाणे उमेदवारांची प्रतिक्षा यादी असेल.
5. निवड झालेल्या उमेदवारास महिला व बाल विकास विभाग , मिशन वात्सल्य मार्गदर्शक सुचना दिनांक 03.08.2022 अन्वये व्यवसाय कर व इतर अनुज्ञेय वजाती वजा जाता मानधन बँक खात्यात जमा करण्यात येईल. मिशन वात्सल्य मार्गदर्शक सुचने व्यतीरिक्त उमेदवारास इतर कोणतेही भत्ते व सोई सुविधा लागु राहणार नाही.
6. निवड झालेल्या उमेदवारांना शासकिय कर्मचाऱ्यांना देय असलेले कोणतेही भत्ते व सोयी सुविधा देय असणार नाहीत.
7. निवड झालेल्या उमेदवारांना भविष्यात सेवेत कायम करण्यासाठी कोणतेही मागणी करणार नाही व त्याबाबत न्यायालयात निवेदन देणार नाही असे हमी पत्र कार्यालयास लिहुन दयावे लागेल.
8. निवड झालेल्या उमेदवारास कार्यालयीन गोपनियतेचा भंग करणार नाही तसेच भारतीय घटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागेल.
9. उमेदवाराविरुध्द भारतातील कोणत्याही पोलिस ठाण्यात गुन्हयाची नोंद नाही या बाबत स्वाक्षांकीत हमीपत्र द्यावे लागेला. याबाबत नियुक्ती नंतर काही खुलास झाल्यास किंवा तशी नोंद आढळल्यास उमेदवाराची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती नंतर 03 महीन्याचे आत संबधीत पोलीस स्टेशनचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
10. उमेदवाराची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने शासकिय कामकाजाबाबत आपणाकडुन दिरंगाई, चुकी अथवा शासकिय नियमांचे उल्लघन झाल्यास आपणांस कोणतीही पुर्व सुचना न देता कोणत्याही क्षणी आपणास पुर्व सुचना न देता कामावरुन कमी करण्याचे अधिकार निवड समिती राखुन ठेवत आहे.
11. निवड झालेल्या उमेदवारास सेवा सोडावयाची झाल्यास एक महिना अगोदर कार्यालयास लेखी सुचना द्यावी लागेल, अथवा एक महिन्याचे मानधन कार्यालयास जमा करावे लागेल.
12. निरिक्षणगृह / बालगृहाचे कामकाज हे अत्यावश्यक सेवेत असल्याने नियुक्त कर्मचारी यांस कामानिमीत्त संर्पुण जिल्हयात, राज्यात, देशात प्रवास करावा लागेल.
13. निवड झोलेल्या उमेदवारास कार्यालयीन कामकाजाची वेळे 09.45 ते सायंकाळी 06.15 पर्यत असल्याने कामाच्या व्याप्तीनुसार अधिक वेळेपर्यत काम करण्याची तयारी ठेवावी लागेल.
14. अर्जदार हा अनाथ असल्यास त्याच्याकडे महिला व बाल विकास विभागाचे अनाथ प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
15. अर्जदारास अर्ज कार्यालयास व्यक्तीश: जमा करावा लागेल. पोस्टाने अथवा इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार नाही.
16. जिल्हा परिविक्षा आणि संघटना संचलित मुलींचे निरिक्षणगृह / बालगृह ही मुलींची संस्था असल्याने या संस्थेकरिता फक्त महिलांनीच अर्ज करावेत.पुरुष उमेदवारांनी अर्ज केल्यास सदर अर्ज रद्द ठरविण्यात येईल. तसेच त्याबाबत उमेदवारास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
17. निवड झालेल्या उमेदवारास आपल्या ताब्यात असलेल्या कार्यालयीन मालमत्तेची योग्य ती काळजी घ्यावी लागेल, सदर मालमत्तेचे नुकसान झाल्यास आपल्या मासिक वेतनातुन नुकसान भरपाई करुन घेण्यात येईल.
18. सदर भरती प्रक्रियेतील एखादया पदाकरिता उमेदवार उपलब्ध न झाल्यास भरती प्रक्रियेतील अटी व शर्ती शिथील करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवलेले आहेत.
19. उमेदवार यांना शासकिय/ निमशासकिय / खाजगी/ स्वयंसेवी कामकाजाचा अनुभव असल्यास त्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

20. जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष व कमाल 38 वर्षे असायला हवे.
21. निवड झालेल्या विवाहीत महिला उमेदवार यांनी दोन्ही नावांसह अर्ज करतांना त्यांच्या नावात बदल झाल्याबाबत अर्जासोबत पुरावा जोडावा. ( उदा. विवाह नोंदणी प्रमाणपत्र, लग्न पत्रिका , प्रतिज्ञा पत्र, राजपत्र इ. )
22. उमेदवार यांनी ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्याबाबत आवश्यक त्या शैक्षणीक कागदपत्रांच्या मुळ कागदपत्रांसह त्याच्या छायांकीत प्रति सोबत ठेवाव्यात.
23. सदर पदांसाठी उमेदवाराने लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यातील कुटुंब प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
24. इच्छुक उमेदवार यांनी भरती प्रक्रियेकरिता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय , मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, आकाशवाणी जवळ, जळगांव या कार्यालयात कागदपत्रे तपासणी साठी दिनांक 05/03/2024 रोजी सकाळी ठिक 08.00 वाजता जाहीरातीमध्ये दिलेल्या आवश्यक त्या शैक्षणीक कागदपत्रांसह व्यक्तीश: उपस्थित रहावे. तसेच मुलाखतीसाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव येथे दिनांक 05/03/2024 रोजी दुपारी ठिक 01.00 वाजता उपस्थित रहावे.
25. जाहिरातीमधील तपशिलाबाबत शंका अथवा अडचण असल्यास कार्यालयीन वेळेत अथवा कार्यालयाच्या पत्तयावर संपर्क साधावा किंवा दुरध्वणी क्रमांक 0257-2228828 वर संपर्क साधावा.
26. सदर जाहिरात www.jalgaon.nic.in वर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत /-**
**( डॉ. वनिता दिलीप सोनगत )**
सदस्य सचिव निवड समिती तथा,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जळगांव

**स्वाक्षरीत /-**
**( आयुष प्रसाद )**
अध्यक्ष, निवड समिती, तथा,
जिल्हाधिकारी, जळगांव.

**<u>अर्जाचा विहीत नमुना</u>**

**कंत्राटी पदासाठी अर्ज**

| |
|---|
| कार्यालयीन उपयोगासाठी<br><br>आवक क्रमांक<br>दिनांक |

| |
|---|
| छायाचित्र व<br>स्वाक्षरी |

**प्रति,**
मा. अध्यक्ष,
निवड समिती, तथा जिल्हाधिकारी,
जळगांव.

**विषय** :- ------------------------------------------------------- **या पदासाठी अर्ज**.

संदर्भ :- -------------------------------------------------------------

**महोदय,**

मी,------------------------------------ या जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित मुलींचे निरिक्षणगृह / बालगृह जळगांव येथील ------------------------ या रिक्त पदासाठी अर्ज करीत असुन माझी खालील प्रमाणे शेक्षणीक व इतर माहिती सादर करित आहे.

01 उमेदवाराचे पुर्ण नाव ( आडनाव प्रथम ) :- --------------------------------------------------------------------------------

02 सध्याचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :- ---------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------

03 कायमस्वरुपी रहीवास पत्ता :- ---------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------

04 जन्म तारिख :- --------------------------------------------------------------------------------

05 ई-मेल आयडी :- --------------------------------------------------------------------------------

06 संपर्क क्रमांक :- --------------------------------------------------------------------------------

07 विवाहीत / अविवाहीत :- --------------------------------------------------------------------------------

08 अवगत असलेली भाषा --------------------------------------------------------------------------------

09 शैक्षणीक अर्हता --------------------------------------------------------------------------------

**( सर्व कागदपत्रांचे शैक्षणीक प्रती जोडाव्यात )**

| **अ** | **शैक्षणीक पात्रता** | **बोर्डाचे / विद्यापीठाचे नाव** | **उत्तीर्ण वर्ष** | **एकुण गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | एस.एस.सी | | | | |
| 2. | एच.एच.सी. | | | | |
| 3. | पदवी. | | | | |
| 4. | पदव्युत्तर पदवी | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5. | एम.एस.सी.आय.टी | | | | |
| 6. | शासन मान्य मराठी टंकलेखन 30 श.प्र.मि. | | | | |
| 7 | शासन मान्य इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि. | | | | |
| 8 | शासन मान्य इतर अभ्यासक्रम | | | | |

10. अनुभवाचा तपशिल.

| **अ.क्र.** | **कार्यालयाचे नाव** | **पदनाम** | **कामाचे स्वरुप** | **अनुभव वर्षामध्ये** |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |

11. उमेदवारावर गुन्हा / न्यायालयीन प्रकरण / शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित आहे काय :-

**होय / नाही**.

12. अर्जासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे :-

1 ---------------------------------------------------------------------------------------

2 ---------------------------------------------------------------------------------------

3 ---------------------------------------------------------------------------------------

4 ---------------------------------------------------------------------------------------

5 ---------------------------------------------------------------------------------------

6 ---------------------------------------------------------------------------------------

7 ---------------------------------------------------------------------------------------

8 ---------------------------------------------------------------------------------------

--------------------------

( उमदेवाराचे नाव व सही )

दिनांक :- / /2024.

ठिकाण :-

**प्रमाणपत्र**

मी श्री/श्रीमती/सौ/कुमारी----------------------------------------------------------------------------------------------------------
--- प्रमाणीत करिता / करिते की, वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. वर नमुद माहिती ही खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील, तसेच सदर पदावर नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असल्याने शासन सेवेत कायम करण्यासाठी मी भविष्यात हक्क सांगणार नाही अशी लेखी हमी देत आहे.

---------------------------

( उमदेवाराचे नाव व सही )

दिनांक :- / /2024.

ठिकाण:-

**लहान कुटुंबाचे प्रतिज्ञा पत्राचा नमुना**

**प्रमाणपत्र**

मी श्री/श्रीमती/सौ/कुमारी----------------------------------------------------------------------------------------------------------
--- श्री.---------------------------------------------------------- यांचा मुलगा/ मुलगी वय------------------- वर्ष -------------
राहणार------------------------------------------------------------------------------------------------------------------------
------- द्वारे जाहीर करतो / करिते की,

1. मी जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना संचलित मुलींचे निरिक्षणगृह / बालगृह जळगांव येथे--------------------------------
--------

या पदासाठी अर्ज करित आहे.

2. आज रोजी मला------------------------------------------- इतकी, हयात मुले आहेत. त्यापैकी मला दि. 28 मार्च 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची / अपत्यांची संख्या----------- मुलगा----------- मुलगी ----------- आहे. व हयात असलेल्या मुलांची / अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर नियमानुसार सदर पदासाठी मला अपात्र ठरविल्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही याची मला पुर्णत: जाणीव आहे.

---------------------------

( उमदेवाराचे नाव व सही )

दिनांक :- / /2024.

ठिकाण:-